☏- 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

नियंत्रण कक्ष ☏ - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट/455/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 /                                   दिनांक : 05/12/2025

# 1)खुन :—

**मुक्रामाबाद :—** दिनांक 03.12.2025 रोजी 19.30 वा. चे सुमारास, **मौजे राजुरा बु. ता. मुखेड जि. नांदेड येथे**, यातील मयत नामे राहुल संतोष येरगे, वय 17 वर्षे रा. अंबुलगा बु. ता.मुखेड यास एक विधिसंघर्षीत बालक व आरोपी नामे मंगेश माधवराव इंगळे, व इतर अनोळखी यांनी संगणमत करून मयतास व त्यांचे मित्रास जुन्या भांडणाचे कारणावरून धक्काबुक्की करून मयतास मारहाण करून गंभीर दुखापत करून खुन केला. वगैरे **फिर्यादी संतोष व्यंकटराव येरगे, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. अंबुलगा बु.ता.मुखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 214/2025 कलम 103(1),115(2),3(5) भारतीय न्याय संहिता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री चव्हाण, मो.क्रं. 9082426369** हे करीत आहेत.

# 2)घरफोडी :—

**1)विमानतळ :—** दिनांक 03.12.2025 रोजी 06.30 वा. ते. दिनांक 04.12.2025 रोजी 05.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी शिवनगर नांदेड येथे**, यातील फिर्यादीचे घराचे दरवाजाचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून घरातील कपाटातील सोन्या चांदीचे दागीने व पितळी देवाचे मुर्ती असा एकुण किंमती 1,70,000/—रु चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला.वगैरे **फिर्यादी यादव मारोती कोंडेवाड, वय 42 वर्षे, रा. शिवनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 499/2025 कलम 331(4),305 भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/जोंधळे, मो. नं. 9175324824** हे करीत आहेत.

**2)रामतीर्थ :—** दिनांक 02.12.2025 रोजी 16.00 वा. ते. दिनांक 04.12.2025 रोजी 07.15 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी नरसी ता.नायगाव येथे**, यातील फिर्यादीचे घराचे पाठीमागील दरवाजा वाकवून आत प्रवेश करून घरातील कपाटातील सोन्याचे दागीने किंमती 48,000/—रु. व नगदी 40,000/—रु. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला.वगैरे **फिर्यादी प्रमोद मारोतीराव चिवळे, वय 43 वर्षे, रा. नरसी ता.नायगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतीर्थ** गुरनं 392/2025 कलम 331(3),(4),305 भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2542 सोनकांबळे, मो. नं. 9822172300** हे करीत आहेत.

# 3)अवैध रेती चोरी :—

**1)मुदखेड :—** दिनांक 03.12.2025 रोजी 23.10 वा. चे सुमारास, **मौजे महाटी शेत शिवार गोदावरी नदी किनाऱ्यावर ता.मुदखेड येथे** यातील आरोपी नामे 1.भिमराव गंगाधर जाधव, शेत मालक 2.दोन मोटार सायकल चालक व इतर यांनी संगनमत करून गोदावरी नदीचे पात्रातुन विना परवाना बेकायदेशीररीत्या रेती उपसा करून 17 ब्रास रेती किंमत 34,000/रु. एक जनरेटर, दोन लोखंडी चैन ब्लॉक, दोन मोटार सायकल व इतर साहित्य असा एकुण 2,74,000/रु. चा मुद्देमाल उत्खनन करुन विक्री करण्याचे उद्येशाने साठवनुक केली .वगैरे **फिर्यादी पोउपनि/रामदास संभाजीराव श्रीमंगले, नेम पोस्टे भोकर सलंग्न अप्पर पोलीस अधीक्षक कार्यालय भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 219/2025 कलम 303(2),3(5) बीएनएस– 2023 सह कलम 48(7),48(8)म.ज.म. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/616 चक्रधर मो.क्रं. 7020448411** हे करीत आहेत.

**2)विमानतळ :—** दिनांक 04.12.2025 रोजी 02.30 वा. चे सुमारास, **आसना बायपास ते खंडोबा चौक रोडवर नांदेड येथे** यातील आरोपी नामे 1.सुनिल यशवंत सुर्यवंशी, वय 24 वर्षे, रा. बळेगाव ता.उमरी 2.गौरव पंडितराव भालेराव वय 20 वर्षे, रा. यमशेटवाडी नांदेड हे विना परवाना बेकायदेशीररीत्या हायवा वाहन क्रमांक एमएच/26 सीएच–8676 किंमती 15,00,000/—रु. चे मध्ये पाच ब्रास रेती किंमत 20,000/रु. चे मुद्देमालासह वाहतुक करीत असताना मिळून आले. वगैरे **फिर्यादी पोनि/चितांबर शंकरराव कामठेवाड, नेम पोस्टे विमानतळ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 496/2025 कलम 303(2)बीएनएस–2023 सह कलम 48(7)म.ज.म.प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/614 सितारे, मो.क्रं. 9823170905** हे करीत आहेत.

## 4)चोरी :–

**माहूर :–** दिनांक 04.12.2025 रोजी दुपारी 02.30 वा.चे सुमारास, **सहयार्द्री टि पॉईंट बस स्थानक माहूर ता.माहूर येथे,** यातील फिर्यादी हे बसमध्ये गर्दीत चढत असताना त्यांचे गळयातील सोन्याचे मंगळसुत्र किंमती 35,000/–रू.चे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी राधाबाई मारोती सुपले, वय 60 वर्षे, रा. शिरपूर ता. महागाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माहूर** गुरनं 208/2025 कलम 303(2) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/29 मडावी,मो.नं. 9422116433** हे करीत आहेत.

## 5)भारतीय हत्यार कायदा :–

**हिमायतनगर :–** दिनांक 03.12.2025 रोजी 23.40 वा. चे सुमारास, **परमेश्वर कमान जवळ हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे शिवा नागोराव कमलवाड, वय 26 वर्षे रा. प्रताप नगर हिमायतनगर हा विना परवाना बेकादेशीररीत्या एक लोखंडी चाकु आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोनि/अमोल हरीदास भगत, ने. पोस्टे हिमायतनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 274/2025 कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2401 जाधव, मो.क्रं. 9821869685** हे करीत आहेत.

## 6)फसवणुक :–

**अर्धापूर :–** दिनांक 26.08.2024 रोजी 00.01 वा.ते दिनांक 11.04.2025 रोजी 14.30 वा.चे दरम्यान **दुय्यम निबंधक कार्यालय अर्धापूर ता.अर्धापूर जि.नांदेड येथे,** यातील आरोपी अशोक तुकाराम कल्याणकर, वय 42 वर्षे, रा.कामठा बु. ता. अर्धापूर याने फिर्यादीचे ताब्यातील व नावावरील शेत जमिन विक्रीकरणेसाठी साक्षीदार समक्ष सौदाचिठ्ठी करून ठरलेल्या रक्कमे प्रमाणे काही रक्कम बयाना म्हणून 16,80,000/–रू दिले व उर्वरीत रक्कम 14,80,000/–रू देवून रजिस्ट्री करून घेत असताना रजिस्ट्री करून न देता पळून जावून फिर्यादीची फसवणुक केली.वगैरे **फिर्यादी सोनाली माधवराव देशमुख, वय 50 वर्षे, रा.गणेशनगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन पोस्टे अर्धापूर गुरनं 696/2025 कलम 318(4),338,336(2) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/कुंडगीर, नेम आर्थिक गुन्हे शाखा नांदेड मो.नं. 7774005841** हे करीत आहेत.

## 7)जुगार :–

**रामतीर्थ :–** दिनांक 04.12.2025 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **नरसी बसस्थानक जवळ ता.नायगाव येथे,** यातील आरोपी नामे 1.भिमराव मोहन वाघमारे, वय 30 वर्षे, रा.औराळा ता.नायगाव 2.एकनाथ गंगाधर चोपवाडे, वय 32 वर्षे, रा. कासराळी हे विना परवाना बेकायदेशिररित्या महालक्ष्मी ऑनलाईन नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 3050/–रु.व संगणक मॉनीटर,प्रिंटर,इतर साहित्य असा एकुण किंमत 18,550/–रु. चा मुद्देमाल व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/नागनाथ हणमंतगोडा तुकडे, ने.स्थागुशा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतीर्थ** गुरनं 393/2025 कलम 12(अ),म.जु.कायदा सह कलम 3,4 लॉटरी अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2542 मुंगडे, मो.नं. 7588086761** हे करीत आहेत.

## 8)प्रोव्हिबिशन :–

**1)माहूर :–** दिनांक 04.12.2025 रोजी 15.00 वा. चे सुमारास, **मौ पानोळा ता. माहूर येथे,** आरोपी नामे कैलास मेरचंद राठोड, रा. पानोळा ता.माहुर हा विना परवाना बेकायदेशिररीत्या हातभट्टी गावठी दारु रसायन किंमत 4500/–रू.चा मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1243 ज्ञानोबा किशनराव कवठेकर, नेम स्थागुशा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माहूर** गुरनं 207/2025 कलम 65 (ई)म.प्रो.का प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1326 चौधरी, मो.नं. 915813034** हे करीत आहेत.

**2)कंधार :–** दिनांक 04.12.2025 रोजी 14.30 वा. चे सुमारास, **मौ पेठवडज ता. कंधार येथे,** आरोपी नामे किशन एकनाथ कोरमवाड, वय 52 वर्षे, रा. पेठवडज ता.कंधार हा विना परवाना बेकायदेशिररीत्या देशी दारु भिंगरी संत्रा किंमत 2640/–रू.चा मुद्देमाल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1265 देविदास नागोराव गिते, नेम पोस्टे कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 407/2025 कलम 65 (ई)म.प्रो. का प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1265 गिते, मो.नं. 8000780777** हे करीत आहेत.

## 9)विद्युत शॉक लागून मृत्यु :—

**नांदेड ग्रामीण :—** दिनांक 04.12.2025 रोजी 11.40 वा. सुमारास **वसरणी शिवार नांदेड येथे,** यातील **मयत नामे रोहित मनोज यादव, वय 21 वर्षे रा. नवाघाट इतवारा नांदेड** यास शेतातुन गेलेल्या इलेक्ट्रीक लाईनचे लटकलेले तारेचा विद्युत शॉक लागुन बेशुध्द अवस्थेत मिळून आल्याने त्यास उपचार कामी शासकीय दवाखाना विष्णुपुरी येथे दाखल केले असता तो मरण पावला. वगैरे **खबर देणार पारस राधेश्याम चौधरी, वय 42 वर्षे रा. दिलीपसिंग कॉलनी नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरून **पोस्टे नांदेड ग्रामीण आ. मृ. 105/2025** कलम 194 बीएनएस—2023 कायदा प्रमाणे दाखल असुन **तपास पोहेकॉ/648 पांचाळ मो.नं. 9922129771** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड